# फॉर्म 15G आणि 15H

मिळकत कर कायदा, 1961 च्या तरतुदीअंतर्गत असलेल्या लागू दरावर मुदत ठेवीवर दिलं जाणारं व्याज/केलेल्या क्रेडिटवर डिडक्शन ऑफ टॅक्स ॲट सोर्स (टीडीएस)ची कपात केली जाते. तसेच, खालील प्रकरणात टीडीएस लागू होणार नाही:

1. आर्थिक वर्षात (1 एप्रिल ते 31 मार्च दरम्यान) भारतात राहाणाऱ्या **निवासी** व्यक्तीला बँकेच्या शाखेकडून दिली जाणारी देय व्याज/क्रेडिट केलं जाणारं व्याज जर ₹10,000 (1 जून 2007 आधी, ₹5,000) पेक्षा जास्त होत नसेल.
2. **कोणत्याही अश्या व्यक्तीच्या बाबतीत (कंपनी किंवा फर्म वगळून)** (सेक्शन 197 ए (1ए) नियम 29 सी)
   - अ. जी भारतात राहाते; *आणि*
   - आ. संबंधित आर्थिक वर्षात (1 एप्रिल ते 31 मार्च दरम्यान) **एकूण मिळकत वार्षिक एकूण मिळकत कर दायित्व काहीच नसेल** तर (कृपया याची नोंद घ्यावी की कोणतही टीडीएस न धरता एकूण मिळकत कर दायित्व संकलित केलं आहे); *आणि*
   - इ. अश्या व्यक्तीच्या प्रकरणात संबंधित आर्थिक वर्षात मुदत ठेवीवर (एक किंवा अनेक) एकूण 'व्याज' देय झालं/क्रेडिट करण्यात आलं व ते इन्कम टॅक्सला देय होणाऱ्या जास्तीत जास्त रकमेपेक्षा **अधिक होत नसेल** तर; *आणि*
   - ई. दर आर्थिक वर्षात जे बँकेच्या शाखेत आगाऊ स्वरूपात पूर्णपणे भरलेला डिक्लरेशन **फॉर्म नं 15G (डुप्लिकेट द्यावा)** भरत असेल. कृपया याची नोंद घ्यावी की फॉर्म 15G **प्रत्येक** आर्थिक वर्षात भरायला हवा. कृपया याचीही नोंद घ्यावी की टीडीएस साठी असं सादरीकरण असेल (बँकेच्या शाखेला) तर त्या तारखेपूर्वी किंवा दिलं जाणारं व्याज/क्रेडिट होणारं व्याज याच्या आधी फॉर्म 15G भरण्यात विलंब झाला/कसूर झाला तर टीडीएसचं दायित्व येईल. त्यामुळे टीडीएस रिफंडचा कोणताही दावा थेट मिळकत कर विभागाकडे जाईल आणि बँकेकडे त्याचं दायित्व येणार नाही.
3. **कोणत्याही वैयक्तिक प्रकरणात** (सेक्शन 197 ए (1सी) यासह नियम 29 सी वाचा):
   - अ. जी व्यक्ती भारतीय **निवासी** आहे; *आणि*
   - आ. ज्या व्यक्तीचं वय संबंधित आर्थिक वर्षात (1 एप्रिल ते 31 मार्च दरम्यान) **कोणत्याही वेळेला 65 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त आहे;** *आणि*
   - इ. ज्याचं वार्षिक एकूण मिळकत कर दायित्व, त्याच्या/तिच्या **एकूण मिळकतीवर संबंधित आर्थिक वर्षासाठी हिशोबात धरल्यावर ते काहीच येत नसेल** तर (कृपया याची नोंद घ्यावी की कोणतही टीडीएस न धरता एकूण मिळकत कर दायित्व संकलित केलं आहे) *आणि;*
   - ई. ज्याने बँकेच्या शाखेला प्रत्येक आर्थिक वर्षात संपूर्णपणे भरलेल **फॉर्म नं 15H (डुप्लिकेट द्यावं)** स्वरूपातील डिक्लरेशन आगाऊ भरलेलं आहे. कृपया याची नोंद घ्यावी की फॉर्म 15H **प्रत्येक** आर्थिक वर्षात भरायला हवा. कृपया याचीही नोंद घ्यावी की टीडीएस साठी असं सादरीकरण असेल (बँकेच्या शाखेला) तर त्या तारखेपूर्वी किंवा दिलं जाणारं व्याज/क्रेडिट होणारं व्याज याच्या आधी फॉर्म 15F भरण्यात विलंब झाला/कसूर झाला तर टीडीएसचं दायित्व येईल. त्यामुळे टीडीएस रिफंडचा कोणताही दावा थेट मिळकत कर विभागाकडे जाईल आणि बँकेकडे त्याचं दायित्व येणार नाही.

HSBC

Issued by The Hongkong and Shanghai Banking Corporation Limited, India (HSBC). Incorporated in Hong Kong SAR with limited liability.